MHKO070022632019

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र. १०१५/२०१९**

**( महाराष्ट्र शासन — वि. – विलास कोळी )**

**निशाणी क्र. १ वर आदेश**

प्रस्तुतचा खटला महाराष्ट्र जुगार बंदी कायद्याच्या कलम १२(अ) अन्वये दाखल करण्यात आला आहे. आरोपी तर्फे विधीज्ञांनी आरोपी विलास विठ्ठल कोळी याचा मृत्यू झाल्याबाबतची पुरसिस निशाणी क्र. १६ वर दाखल केली. तसेच त्यासोबत आरोपीच्या मृत्यू प्रमाणपत्राची छायांकीत प्रत दाखल केली आहे. सदर मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन करता प्रस्तुत कामातील आरोपी विलास विठ्ठल कोळी याचा दिनांक ०६/१०/२०२२ रोजी मृत्यू झाल्याचे स्पष्ट होते. सबब, आरोपीचा मृत्यू झाल्यामुळे प्रस्तुत प्रकरण पुढे चालविणे न्यायोचित नाही. त्यामुळे खालील अंतिम आदेश पारित करण्यात येतातः–

**आदेश**

१. आरोपीच्या मृत्यूमुळे प्रस्तुतचा खटला संपविण्यात (Abated) येतो.

२. खटल्यातील जप्त मुद्देमालाची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याचे निर्देश ठाणे अंमलदार, जयसिंगपूर यांना देण्यात येतात.

३. प्रकरण दाखल दप्तर करण्यात येते.

स्वाक्षरीत/–

( **आनंद दे. करभाजन**)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

ठिकाण — जयसिंगपूर.

दिनांक — १२/०१/२०२४

टीप :- मा. पीठासीन अधिकारी यांच्या डिजीटल स्वाक्षरी टोकनची वैधता संपुष्ठात आली आहे.

-: **दाखला** :-

दाखला देण्यात येतो की, या पी.डी.एफ. फाईल निकालपत्र/आदेशामधील सर्व मजकूर हा मूळ निकालपत्र/आदेशामधील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | सौ. पल्लवी विजेंद्र सासने |
| न्यायालयाचे नांव | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. |
| न्यायनिर्णय / आदेश जाहीर केल्याची तारीख | १२/०१/२०२४ |
| न्यायनिर्णय / आदेश तयार झाल्यानंतर पिठासीन अधिका-यांनी सही केल्याची तारीख | १२/०१/२०२४ |
| न्यायनिर्णय/ आदेश अपलोड केल्याची तारीख | १६/०१/२०२४ |